आदेश :-

जा.क्र. ४१/वाचक/ध्वनी प्रदुषण/२०१५, 3067
कार्यालय पोलीस अधीक्षक,नांदेड.
दिनांक :-19 /०९/२०१५

विषय :- ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन ) नियम २००० व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधिल तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत.

०००

उपरोक्त विषयान्वये आपणास आदेशीत करण्यात येते की, जनहित याचीका क्रमांक १७३/२०१० डॉ. महेश बेडेकर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर यामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडुन ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन ) नियम २००० व महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ मधिल तरतुदींची प्रभावी अमंलबजावणी करण्याचे निर्देष निर्गमीत झालेले आहेत. सदर अनुषंगाने पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २८/०७/२०१५ रोजीच्या शासन निर्ययाद्वारे पोलीस उप अधिक्षक दर्जाचा अधिकारी यांची ध्वनी प्रदुषण नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी ध्वनी प्राधिकरण (Authority) म्हणुन नियुक्ती केलेली आहे. तसेच गृह विभाग (विशेष), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १४/०७/२०१५ रोजीच्या अधिसुचनेद्वारे (Notification) महाराष्ट्र (मुंबई) पोलीस अधिनियम - १९५१ च्या तरतुदी अंतर्गत पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी (PI & API) यांना ध्वनी प्रदुषण नियंत्रणा करीता प्राधिकृत केलेले आहे.

तरी सर्व सहायक पोलीस अधीक्षक, सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, नांदेड यांनी सध्या चालु असलेल्या गणपती उत्सवा दरम्यान आगामी बकरी ईद, दुर्गा उत्सव व इतर जयंती, उत्सव तसेच दैनंदिन कामकाजा दरम्यान ध्वनी प्रदुषणा संबंधी तक्रारी प्राप्त झाल्यास ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन ) नियम २००० व महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ मधिल तरतुदींची प्रभावी अमंलबजावणी करावी. सदर प्रकरणी आपण ध्वनी प्रदुषण नियंत्रणा संबंधी किती कारवाई केल्या याबाबतचा आढावा उत्सव संपल्यानंतर घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

Param

(परमजीत सिंह दहिया)
पोलीस अधीक्षक,नांदेड

प्रति :-

१) सर्व सहायक पोलीस अधीक्षक,
२) सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी,
३) सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी,
   नांदेड जिल्हा.

19-9-15

Notification

Home Department (Special),

Mantralaya, Mumbai - 400 032, dated the 14th July, 2015

## NOTIFICATION

**No. DIS 0910 / C.R.434 / SPL 1 B** :- Under the provisions of the Maharashtra Police Act, 1951, the following officers are declared as authorities for the purpose of control of Noise Pollution.

| Sr.No. | Area | Jurisdiction | Designation of the Officer |
|---|---|---|---|
| 1. | All Police Commissionerate areas in the State of Maharashtra. | Every police station area. | The officer not below the rank of Inspector of the respective police station. |
| 2. | All District areas other than Police Commissionerate areas. | Every police station area. | The officer not below the rank of Inspector of the respective police station or the officer in charge of the Police Station. |

The Director General of Police, all Commissioners of Police, all District Magistrates and all Superintendents of Police are instructed to publish the names, addresses and other details of the above authorities under their respective control for the respective areas; give wide publicity in the local newspapers, on local cable networks and on their respective websites and the website of the District Collectors, concerned Municipal Corporations and Municipal Councils. They are also instructed to make sure that the names of the above Authorities are displayed on the notice board of all Ward Offices of all Municipal Corporations/Municipal Councils.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

( S. J. Sovitkar )
Deputy Secretary, Government of Maharashtra

गृह विभाग (विशेष),
मंत्रालय, मुंबई, दिनांक १४ जुलै, २०१५.

## अधिसूचना

क्रमांक डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४/वि.शा.१ ब :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या तरतुदींअंतर्गत ध्वनी प्रदुषण नियंत्रणाकरिता खालील अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | क्षेत्र | कार्यकक्षा | अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालयाची क्षेत्रे | सर्व पोलीस स्टेशन क्षेत्र. | संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी. |
| २. | महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये वगळून सर्व जिल्हा क्षेत्रे. | सर्व पोलीस स्टेशन क्षेत्र. | संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी किंवा पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी. |

पोलीस महासंचालक, सर्व पोलीस आयुक्त, सर्व जिल्हादंडाधिकारी आणि सर्व पोलीस अधिक्षक यांना सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी वरील सर्व प्राधिकाऱ्यांची नावे, पत्ते व इतर तपशिलाबाबत स्थानिक वृत्तपत्रे, स्थानिक केबल नेटवर्क, त्यांच्या संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका आणि नगर परिषदांच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी. त्यांना अशाही सूचना देण्यात येत आहेत की, वरील प्राधिकाऱ्यांची नावे सर्व महानगरपालिका / नगर परिषदा यांच्या वॉर्ड कार्यालयामधील सूचना फलकांवर स्पष्टपणे दिसेल अशा पद्धतीने दर्शविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.ज.सोवितकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

G:\14-7\SPL-18\2014\CR4 ... 173-10\mahesh bedek ... s State of Maharashtra.doc

जा.क्रं.जिविशा/ध्वनि प्रदुषण /1962/२०१७
कार्यालय पोलीस अधिक्षक, नांदेड
दिनांक : २२.०३.२०१७

विषय : जनहित याचीका क्र. १७३/२०१० डॉ. महेश बेडेकर वि.महाराष्ट्र शासन व इतर
संदर्भ : मा. पोलीस महासंचालक महराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्रक जा.क्र. २४/३४/जनहीत याचीका/१७३/१०/२४०/२०१७मुंबई दि.१८.०३.२०१७ अन्वये.

या सोबत जोडलेल्या उपरोक्त संदर्भीय पत्रकाचे अवलोकन करावे जनहित याचीका क्र. १७३/२०१० ची पुढील सुनावनी दि. ०७.०४.२०१७ रोजी ठेवण्यात आलेली आहे. व मा.उच्य न्यायालय ध्वनी प्रदुषण संदर्भातील सर्व बाबींचा व दिलेल्या आदेशांची अमंलबजावणी घटक स्तरावर करण्यात आली किंवा कसे याबाबत अवलोकन करणार आहे.

तरी सदर बाबतीत गंभीर लक्ष घालून मा. उच्य न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या सुचना, शासनाने व मा. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून व इकडील कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रक व सुचनांप्रमाणे ठोस कार्यवाही करण्यात यावी.

दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न केल्यास आपणास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल याची खबरदारी घ्यावी.

मा.उच्य न्यायालयात पुढील तारखेपुर्वी ध्वनी प्रदुषण बाबत करण्यात आलेली कार्यवाहीची सविस्तर माहीती या कर्यालयास बिनचुक सादर करावी. उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी या बाबत जातीने लक्ष घालुन पाठपुरावा करावा .

**मा.पो.अ.यांचे आदेशावरुन /-**
सोबत (०१)

पोलीस अधीक्षक नांदेड, करीता
O/C

प्रति,

सर्व पो.स्टे.स्वाधीन अधिकारी नांदेड जिल्हा .

माहीतीस्तव/-

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड जिल्हा.

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

वेब साईट :- www.nanded.gov.in ई-मेल :- nandedrdc@gmail.com
दूरध्वनी क्र. :- (02462) 235077 फॅक्स क्र. :- (02462) 238500
विभाग :- महसूल-1 शाखा:-दंडाधिकार

pollusion court

30

10505
29-3-17

अत्यंत तातडीचे.

क्रमांक 2015-आरबी-1-डेस्क-2-टे-(5/2)-सिआर-88

दिनांक 29 मार्च 2017

प्रति,

पोलीस अधिक्षक,

नांदेड.

पो.अ.
अपि.पो.अ.
पो.उप.अ.

2 — 30 MAR 2017

का.अ.
प्र.लि.
आ.क्रमांक

PR P.I.
Tray
P. I. DSB

2511

विषयः- जनहित याचिका क्र.173/2010 डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणांत ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी जिल्हयात खालील प्रमाणे संनियंत्रण समिती स्थापन करणे बाबत.

संदर्भ:- गृह विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मूंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.डिआयएस 0910/प्र.क्र.434 (भाग-2)/विशा 1 ब दिनांक 28 फेब्रूवारी 2017

उपरोक्त संदर्भात नमुद गृह विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मूंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.डिआयएस 0910/प्र.क्र.434 (भाग-2)/विशा 1 ब दिनांक 28 फेब्रूवारी 2017 ची प्रत सोबत जोडली आहे. ज्याव्दारे त्यांनी जनहित याचिका क्र.173/2010 डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणांत ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी जिल्हयात संनियत्रण समिती स्थापन करुन उक्त समिती मार्फत शासन परिपत्रकानूसार सण/उत्सव कालावधीत कार्यवाही करण्यांचे निर्देश दिले आहे.

सबब उक्त शासन परिपत्रकात नमूद प्रमाणे संनियत्रण समिती स्थापन करुन सण/उत्सव कालावधीत नमूद प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस सादर करावा.

(सही)
जिल्हादंडाधिकारी नांदेड करिता

प्रत :-

जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना शासन परिपत्रकांची प्रत माहिती व कार्यवाहीस्तव.

(सही)
जिल्हादंडाधिकारी नांदेड करिता

01/04/17

श्री. एस० एन० शिन्दे SRO
प्रादेशिक अधिकारी मो.नं. 9423490087
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
नांदेड
कार्यालय - उदय शामपिंड्याच्या पाठीमागे
वर्कशॉप नांदेड.

जे. कि. रंगोवार

# पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

**दुरध्वनी क्रं.** : 02462- 234658 **फॅक्स नंबर** : 02462-235103
**शाखा**: जिल्हा विशेष शाखा ई-मेल :- dsbnanded@gmail.com
जा.क्र. जिविशा/ओएस/ध्वनि प्रदुषण परिमत्रक. / 2172 /2017 नांदेड दिनांक: 31/03/2017
01

गोपनिय

**विषय :- ध्वनि प्रद्रुषण नियंत्रणासाठी संनित्रण समिती स्थापनेचे परिपत्रका बाबत.**

**संदर्भ :- शासन परिपत्रक क्र.डिआयएस 0910/ प्र.क्र.434(भाग-2)/विशा 1 ब शहीद भगतसिंग चौक,मादाम कामा मार्ग,मंत्रालय ,मुंबई 400 032 दिनांक 28 फ्रेब्रुवारी 2017 अन्वये.**

---000---

यापुर्वी शासन परिपत्रक क्र.डिआयएस 0910/ प्र.क्र.434(भाग-2)/विशा 1 ब दिनांक 06.07.2015,14.07.2015,28.07.2015 व मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.173/2010 संभांत दिनांक 13.03.2015,24.06.2015,तसेच 10,11,12 व 16.08.2016 रोजी दिलेले आदेश आपल्या पो.स्टे.ला पाठविण्यात आलेले आहेत. त्याचे अवलोकन करावे.

उपरोक्त आदेशाचे पो.स्टे.प्रभारी अधिकारी यांचेकडून प्रभाविपणे अंमलबजावणी होत नसल्याने उपरोक्त शासन परिपत्रका प्रमाणे अनुक्रमणिका **" क "** मध्ये दर्शीवल्या प्रमाणे जिल्हास्तरावर समिती संघटीत केली आहे.ती खालील प्रमाणे

1. अध्यक्ष :- अप्पर पोलीस अधीक्षक, नांदेड
2. सदस्य :- पोलीस उप अधिक्षक,गृह
3. सदस्य :- प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रद्रुषण नियंत्रण मंडळ नांदेड.

उपरोक्त प्रमाणे गठित करण्यात आलेल्या संनियंत्रण समितीची कार्यकक्षा अ.क्र. 1 ते 11 दर्शवुन कार्यवाही बाबत सुचना दिलेल्या आहेत.

या सोबत जोडलेल्या परिपत्रकाचे पो.स्टे.प्रभारी अधिकारी यांनी काळजीपुर्वक अवलोकन करुन कडकपणे विनाविलंब दर्शवीलेल्या सुचना व अधिकारा प्रमाणे अमंलबजावणी करावी.यात कोणतेही दुर्लक्ष होणार नाही.याची दक्षता घेतील.

( संदिप डोईफोडे )
**अपर पोलीस अधीक्षक, नांदेड**

**प्रति.**

सर्व पो.स्टे.स्वाधिन अधिकारी, नांदेड जिल्हा.

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेसितः**

सहायक पोलीस अधीक्षक, नांदेड शहर.
सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी, नांदेड जिल्हा.

# पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

**दुरध्वनी क्रं.** : 02462- 234658 **फॅक्स नंबर** : 02462-235103

**शाखा**: जिल्हा विशेष शाखा ई-मेल :- dsbnanded@gmail.com


जा.क्र. जिविशा/ ध्वनि प्रदुषण समिती नियुक्ती /2459/2017 नांदेड दिनांक: 12/04/2017

गोपनिय

प्रति,

**मा.जिल्हादंडाधिकारी ,**

**नांदेड.**

**विषय :-** जनहित याचिका क्र.173/2010 डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणात ध्वनि प्रदुषण नियंत्रणासाठी जिल्हयात संनियत्रण समिती स्थापन केले बाबत.

**संदर्भ :-1**. क्रमांक 2015 -आरबी -1-डेक्स-2- टे- (5/1)सिआर-88 /19505/ दिनांक 29/3/2017 अन्वये.

**2**. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिविशा/ओएस/ध्वनि प्रदुषण परिपत्रक /2172/2017 दिनांक 01/03/2017 .

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार ध्वनि प्रदुषण नियंत्रणासाठी नांदेड जिल्हयात शासन परिपत्रक क्र.डिआयएस0910/प्र.क्र.434/(भाग-2)विशा 1 व शहिद भगतसिंघ चौक ,मादाम कामा मर्ा, मंत्रालय मुंबई 400 032 दिनांक 28/फेब्रुवारी/2017 अन्वये पत्रकात नमुद प्रमाणे संदर्भ क्रमांक 02 प्रमाणे प्रमाणे संनियत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

सदर पत्रकाची प्रत या सोबत जोडून सादर केली आहे. करिता अहवाल सादर..

**पोलीस अधीक्षक, नांदेड**

**करिता.**

Dn/08
1-6-17

# विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.

महाराष्ट्र पोलीस
दुरध्वनी क्रं. - ०२४६२-२५१३१६ नियंत्रण कक्ष क्रं. ०२४६२-२५१२५३
फॅक्स क्रं. -०२४६२-२५१४५१ ई-मेल -ig.nandedrange@mahapolice.gov.in
शाखा :- वाचक शाखा.
जावक क्रं.वाचक/विपोमनि/जनहित या.क्र.१७३/२०१० / 3179 /२०१७
दिनांक : ३१ मे २०१७ 01 JUN 2017

//फॅक्स//

संदर्भ :- उप सचिव महाराष्ट्र शासन यांचे पुरकपत्र क्र. डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४(भाग-२)/विशा १ ब दिनांक ०३/०४/२०१७

विषय :- जनहित याचिका क्र. १७३/२०१० डॉ महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर (ध्वनी प्रदूषण नियंत्रणासीठ संनित्रण समिती स्थापन करण्याबाबत.)

--oo--

उपरोक्त संदर्भीय पुरकपत्राचे अवलोकन व्हावे, त्यात नमुद दोन मुद्दयांसह ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी संनित्रण समिती स्थापन करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

तरी पोलीस अधीक्षक यांनी संदर्भीय पुरकपत्राचे मुद्दा क्र. १ व २ मध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे कार्यवाही करुन उप सचिव महाराष्ट्र शासन यांचे कार्यालयास पाठवुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

( सोबत :- संदर्भीय पत्रक १ )

**मा.विपोमनि यांचे आदेशान्वये/-**

(एन.एच.हाशमी)
वाचक पोलीस निरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र,नांदेड यांचेकरीता

DSB

| |
|---|
| पो.अ. |
| अति.पो.अ. |
| पो.उप.अ. (मु.) |
| 01 JUN 2017 |
| का.अ. |
| प्र.लि. |
| आ.क्रमांक |

प्रति,
पोलीस अधीक्षक,
नांदेड, परभणी,हिंगोली, लातूर.

PS2 भरोसे

2386 / 2017
2/06/2017

D:\Crime - 2017\DCR.doc/LED

लक्षवेध - कार्यासन क्र. २५

प्रति,

**मा. पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

जा.क्र. जिविशा/ध्वनी प्रदुषण/माहिती/3780/2017 नांदेड दिनांक 08.06.2017

**संदर्भ :-** क्र. पोमंस/24/34/जनहित याचिका/173/10/240/15 मुंबई दिनांक 06.06.2017 अन्वये.

**विषय :-** मा. उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्रमांक 173/2010 श्री महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर मध्ये अहवाल सादर केले बाबत

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मा. उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्रमांक 173/2010 श्री महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर (ध्वनिप्रदुषण नियमांचे अंमलबजावणी बाबत) नांदेड जिल्हयाची माहिती यासोबत दिलेल्या प्रपत्राप्रमाणे सादर...

**सोबत :- (01)**

अधीक्षक कार्यालय पोलीस नांदेड

**(मंगेश शिंदे)**
अपर पोलीस अधीक्षक, नांदेड

**प्रत माहितीस्तव सादर :-**

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,नांदेड परिक्षेत्र नांदेड.

# नांदेड जिल्हा पोलीस दल

## जाहिर आवाहन.     जाहिर आवाहन.     जाहिर आवाहन.

मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशावरुन सण / उत्सावाच्या वेळी ध्वनीप्रर्दुषन होऊ नये यासाठी आपण आपआपले सोसायटीमध्ये / गावामध्ये लाऊड स्पीकर मोठ्याने अगर कर्कश आवाजात वाजवु नये. तसेच मा.सर्वाच्च न्यायालयाने पर्यावरण संरक्षणाचा कायदा सन १९८३ व ध्वनी प्रर्दुषन अधिनियम २००० मधील तरतूदींचे सक्त पालन करण्याबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्या अन्वये रात्री १०:०० वा पासुन सकाळी ०६: ०० वा पर्यंत लाऊडं स्पीकर, फटाके, वाद्य वाजविण्यास सक्त बंदी केलेली आहे. तसेच सकाळी ६.०० वा पासुन रात्री १०.०० वा पर्यंत सुध्दा लाऊड स्पीकर, फटाके, वाद्य इत्यादी खालील मर्यादेपेक्षा जास्त आवाजाने वाजविण्यास बंदी केलेली आहे.

| विभागाचे कोड विभाग/झोनची वर्गवारी | | आवाजाची क्षमता (डेसिमल मध्ये) | |
|---|---|---|---|
| | | दिवसाचे वेळ | रात्रीचे वेळ |
| ए | औद्योगिक क्षेत्र (Industriala area) | ७५ | ७० |
| बी | विपणन क्षेत्र (Commcrcial area) | ६५ | ५५ |
| सी | रहिवाशी क्षेत्र (Residential area) | ५५ | ४५ |
| डी | शांतता विभाग (Silence Zone) | ५० | ४० |

वरील नमुद मर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची संबधीतांनी दक्षता घ्यावी. ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सन २००० चे उल्लंघन केल्यास इनव्हायरमेंट (प्रोटेक्शन) ॲक्ट सन १९८३ चे कलम १५ प्रमाणे ५ वर्षे कैदेची किंवा एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते. तसेच शिक्षा होऊन सुध्दा असे गुन्हे चालु ठेवल्यास पुढील प्रत्येक दिवसाला ५ हजार रुपये दंडाची तरतुद आहे. तसेच कलम १५ (१) प्रमाणे शिक्षा लागल्याचे १ वर्षा पर्यंतच्या काळात पुन्हा असे गुन्हे केल्यास ७ वर्षे पर्यंतची शिक्षा होऊ शकते.

या नियमाखालील गुन्हे दखलपात्र, अजामीनपात्र व प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी न्यायालयाकडे चालतील. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन झाल्यास न्यायालयाचा अवमान केला म्हणुन कारवाई होऊ शकते.

ध्वनीप्रदुषण संदर्भातील तक्रार आपण खालील फोन नंबर/ईमेल आयडीवर करु शकता.

नियंत्रण कक्षाचा दुरध्वणी नंबर ०२४६२-२३४७२०/१००

नांदेड जिल्हा पोलीस  वॉटसअप नंबर ८८८८८८९२५५

**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.**

वेब साईट :- www.nanded,gov.in ई-मेल :- nandedrdc@gmail.com

दूरध्वनी क्र. :- (02462) 235077 फॅक्स क्र. :- (02462) 238500

विभाग :- महसूल-1 शाखा:-दंडाधिकार pollusion court

32

40452
3-7-17

अत्यंत तातडीचे.

क्रमांक 2015-आरबी-1-डेस्क-2-टे-(5/2)-सिआर-88 दिनांक 30 जुन 2017

प्रति,

पो.अ. पोलीस अधिक्षक,
अति.पो.अ. नांदेड.
पो.उप.अ. (मु.)

04 JUL 2017

का.अ.
प्र.लि.
आ.क्रमांक 5523

विषयः- ध्वनी प्रदूषण नियमांचे काटेकोरपणे पालन करण्या बाबत.

संदर्भः-
01 गृह विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मूंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.सिआरटी-0314/प्र.क्र.64/विशा-5 दिनांक 24 मे 2017
02 आपले पत्र जा.क्र.जिविशा/ध्वनी प्रदूषण समिती नियूक्ती/2459/2017 दिनांक 12.04.2017.

उपरोक्त विषयी संदर्भात नमुद गृह विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मूंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.सिआरटी-0314/प्र.क्र.64/विशा-5 दिनांक 24 मे 2017 ची प्रत सोबत जोडली आहे. ज्याव्दारे त्यांनी जनहित याचिका क्र.173/2010 मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक 10, 11, 12 व 16 ऑगस्ट 2016 रोजी दिलेल्या आदेशानूसार दिनांक 28.02.2017 च्या शासन परिपत्रकानूसार ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबतची कार्यवाही अधिक प्रभावीपणे करण्यासाठी ध्वनी प्रदूषण सनियंत्रण समिती गठीत केली आहे. सदर समितनीने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार, शांता क्षेत्रामध्ये विविध सण, उत्सव व कार्यक्रमा दरम्यान आवाजाची पातळी (लाऊडस्पीकर, डी.जे, मिरवणूका व तत्सम वाद्य यांच्या आवाजामूळे) ओलांडून ध्वनी प्रदूषण (विनियमय व नियंत्रण) नियम 2000 मधील नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच आवाजाची पातळी (लाऊडस्पीकर, डी.जे, मिरवणूका व तत्सम वाद्य यांच्या आवाजामूळे) ओलांडून ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम 2000 मधील नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे नमूद आहे.

प्रकरणांत आपले संदर्भ क्र.02 वर नमूद पत्राव्दारे जिल्हयात ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी सनियंत्रण समिती गठीत केली असून संदर्भ क्र.01 वर नमूद शासन परिपत्रकानूसार सदर समिती मार्फत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार, विविध सण, उत्सव व कार्यक्रमा दरम्यान ध्वनी प्रदूषण नियंत्रणांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यांत यावी. तसेच वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस सादर करावा.

जिल्हाधिकारी नांदेड करिता

प्रत माहिती व कार्यवाहीस्तवः-

01) अप्पर पोलीस अधिक्षक नांदेड,

02) पोलीस उप अधिक्षक, गृह

03) प्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ नांदेड.

जिल्हादंडाधिकारी नांदेड करिता